## 1. मोड्युलचे सविस्तर वर्णन आणि त्याची रचना

| मोड्यूल सविस्तर | |
|---|---|
| विषयाचे नाव | अर्थशास्त्र |
| अभ्यासक्रमाचे नाव | भारताची आर्थिक प्रगती ०१ (इ.११वी, सत्र पहिले) |
| मोड्युलचे नाव / शीर्षक | १९९१ पासूनच्या आर्थिक सुधारणा भाग १ |
| मोड्यूल आय.डी. | keec_10301 |
| पुर्वापेक्षित | १९५० ते १९९० या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचे ज्ञान |
| उद्दिष्टे | हा धडा वाचल्यानंतर, विद्यार्थ्यांना खालील गोष्टी शिकण्याची व् समजू न घेण्याची पात्रता लाभेल :<br>• आर्थिक सुधारणा म्हणजे काय?<br>• आर्थिक सुधारणांची करणे कोणती?<br>• नवीन आर्थिक योजना<br>• उदात्तीकरण |
| संकेतिक शब्द | आर्थिक सुधारणा, नवीन आर्थिक योजना, उदात्तीकरण |

## 2. Development Team

| Role | Name | Affiliation |
|---|---|---|
| National MOOC Coordinator (NMC) | Prof. Amarendra P. Behera | CIET, NCERT, New Delhi |
| Program Coordinator | Dr. Mohd. Mamur Ali | CIET, NCERT, New Delhi |
| Course Coordinator (CC) / PI | Prof. Neeraja Rashmi | DESS, NCERT, New Delhi |
| Subject Matter Expert (SME) | Mr. Naveen Sadhu | Guru Nanak Public School, Rajouri Garden, New Delhi |
| Review Team | Dr. Meera Malhan<br>Dr. Himanshu Singh | DCAC, University of Delhi<br>Satyawati College (Eve.), University of Delhi |
| Translator | Dr. Parag Ramakant Kukade | Assistant Prof., Takshashila Mahavidyalaya Amravati |

**अनुक्रमाणिका**

१) प्रस्तावना
२) आर्थिक सुधारणांची कारणे
३) नवीन आर्थिक योजना – वैशिष्ठे
४) उदात्तीकरण
४.१औद्योगिक क्षेत्रातील सुधारणा
४.२ आर्थिक क्षेत्रातील सुधारणा
४.३ करातील सुधारणा
४.४ परदेशी चलनातील सुधारणा
५) व्यवहार आणि गुंतवणूक योजनेतील सुधारणा
६) सारांश

**१. प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर काळापासून, भारताने समिश्र आर्थिक रचनेचा पाठपुरावा केला आहे, त्यासाठी बाजारातील आर्थिक पद्धती आणि नियोजित आर्थिक पद्धती यांचे फायदे एकत्रित केले आहेत. काही तज्ञ असा युक्तिवाद करतात की, काही वर्षांनंतर हि योजना परिणामतः काही कायदे आणि नियम यांना प्रस्थापित करेल, ज्यांचे उद्दिष्ट भारतीय अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करून नियमन करणे हे असेल आणि अशाप्रकारे आर्थिक वाढीच्या आणि प्रगतीच्या मार्गात येणाऱ्या अडचणींचा शेवट करेल. इतर लोकांनी मांडले की भारत ज्याने आपल्या प्रगतीचा मार्ग अगदी ठप्प स्थितीपासून सुरुवात केला, तो आज बचतीच्या मार्गांनी आर्थिक वाढ शक्य करून दाखवीत आहे. त्याने वैविध्यपूर्ण औद्योगिक क्षेत्र वाढविले आहे, जेथे विविध प्रकारचा माल उत्पादित केला जातो आणि शेतकी उत्पन्नाचा सतत विस्तार अनुभवला आहे ज्यांतून अन्नाच्या सुरक्षिततेची खात्री दिली जाते.

१९९१ मध्ये भारताने वाढत्या देशबाह्य कर्जांमुळे आर्थिक मंदी अनुभवली होती, आपले सरकार विदेशांकडून आणलेल्या कर्जांची परतफेड करण्यास असमर्थ ठरत होते, परकीय चलन राखीव निधी जो सर्वसाधारणपणे आपण पेट्रोलियम तेल आणि इतर महत्वाच्या वस्तू आयात करण्यासाठी जतन करत असतो, त्याची पातळी खाली गेली आणि एका पंधरवड्यासाठी सुद्धा ते पुरेसे नव्हते. आर्थिक संकट पुढे अधिकतम वाढले कारण अत्यावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडत चालल्या होत्या. या सर्वांनी सरकारला नवीन अर्थी योजनेचा आराखडा आणण्यासाठी भाग पाडले, ज्यामुळे आपल्याकडील आर्थिक विकासाच्या रणनीतीची दिशा बदलली गेली.

**आर्थिक सुधारणा त्या कार्यशील आर्थिक योजनांना सूचित करतात ज्यांचे उद्दिष्ट अर्थव्यवस्थेला बाजारासाठी आणि सेवेसाठी अनुकूल बनविणे आणि खाजगी क्षेत्र व परदेशांतील गुंतवणूक यांचा विस्तार करणे असे असते.**

**आर्थिक सुधारणांची उद्दीष्ठे**

१) भारतीय अर्थव्यवस्था अधिकाधिक स्पर्धात्मक बनविणे.
२) आर्थिक वाढीला आणि प्रगतीला चालना देणे.
३) औद्योगिक कारखान्यांना अधिक सक्षम, कार्यक्षम आणि उत्पादनकारक बनविणे.
४) जागतिक साधनांचा उपयोग करून भारतीय अर्थव्यवस्थेला प्रगतिशील बनविणे.

५) सार्वजनिक उपक्रमांची भूमिका तर्कसंगत बनविणे आणि त्यांच्या कामगिरीला उत्तेजन देणे.
६) आर्थिक वसुलीत येणारी तुट नियंत्रित करणे, ती भरून काढण्याच्या उद्देशाने सतत प्रयत्नशील राहणे.
७) वाढत्या राष्ट्रीय देयातांमुळे चालू खात्यात येणारी वित्तीय तुट कमी करणे.

## २. आर्थिक सुधारणेची कारणे

१९९१ मधील भारताची आर्थिक स्थिती अतिशय दयनीय होती, हि बऱ्याच कारणांच्या एकत्रित परिणामांमुळे झाली.आपल्या देशातील महत्वाच्या आर्थिक सुधारणा घडून येण्यासाठी आपण विविध कारणांवर एकत्रित चर्चा करू.

- **सार्वजनिक क्षेत्रातून कमकुवत कामगिरी:** ४० वर्षांच्या काळामध्ये (१९५१ ते १९९०) सार्वजनिक क्षेत्रांकडे भारताच्या आर्थिक विकासासाठी महत्वाची भूमिका दिली होती. सुरुवातीच्या १५ वर्षांच्या काळामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील संस्था यांनी समाधानकारक कामगिरी दाखविली पण त्यानंतर त्यातील बहुतांश संस्था या नुकसानीत जाऊ लागल्या.तरीही काही थोड्या सार्वजनिक संस्थांचा अपवाद वगळता, त्यांची एकूणच कामगिरी अतिशय निराशादायक व असमाधानकारक होती.बहुतांश सार्वजनिक संस्थांनी सहन केलेल्या मोठया नुकसानाचा विचार करून,सरकारला आवश्यक सुधारणांची निकड भासू लागली आणि त्यांनी खाजगी क्षेत्रावर देखील भर दिला.

- **एकूण राष्ट्रीय देयतेतील तुट:** जेव्हा आयातीतून बळावलेल्या आर्थिक देयता या एकूण निर्यातीतून येणाऱ्या उत्पन्नाच्या तुलनेत अधिक असतात तेव्हा एकूण राष्ट्रीय देयतेतील तुट लक्षात येते. आयात मालावर अधिक जकात व कोटा लादून सुद्धा आयात एकसारखी वाढतच गेली.दुसरीकडे कमी दर्जा व अधिक किमती यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय मालाची निर्यात खुपच कमी झाली.१९८०-८१ मध्ये भारताच्या एकूण देयतेतील वित्तीय तुट एकसारखी वाढतच गेली. असा अंदाज वर्तविला जातो की हि वित्तीय तुट १९८०-८१ मध्ये २२१० कोटी इतकी होती ती वाढत १९९०-९१ मध्ये १७३६७ कोटींपर्यंत गेली.

- **चलनवाढीचा व महागाईचा दबाव:** भारतीय अर्थव्यवस्थेतील किमतीच्या पातळी मध्ये सर्वसाधारण एकसमान वाढ हि पैश्यांचा पुरवठा वाढला आणि आवश्यक वस्तूंचा पुरवठा कमी झाला यामुळे झाली. महागाईचा दर हा सदासर्वदा १७ टक्क्यांच्या आसपास पोहोचलेला असायचा. आयात आणि निर्यात यांमधील पोकळी वाढल्यामुळे तो अधिकच वाढला कारण भारताकडून होणारी निर्यात हि जागतिक बाजारपेठेमध्ये स्पर्धात्मक नव्हती आणि भारताचे निर्यातीतून येणारे उत्पन्न खूप खाली घसरलेले होते.

- **परदेशीय चलन आरक्षण घसरले:** १९९१ मध्ये, परकीय चलन आरक्षण खूप घसरले, ते खूप खालच्या पातळीवर आले आणि त्यामुळे आपल्या देशांत परकीय चलनाचे संकट सुरु झाले.परकीय चलन आरक्षणाने इतक्या खालच्या पातळीवर आणले की दोन आठवड्यांहून अधिक काळाच्या आयातीवर पैसा पुरविणे शक्य नव्हते, पैसा अपुरा पडू लागला किंवा जागतिक व्यवहारासाठी कर्ज देणाऱ्या संस्थाकडून कर्ज घेऊन त्यांचे व्याज फेडणे शक्य

नव्हते.हे संकट इतके तीव्र झाले की सरकारला सोने तारण ठेऊन कर्ज काढण्याची वेळ आली.हि जागतिक कर्जे मिळविण्यासाठी जागतिक संस्था भारतीय अर्थव्यवस्थेकडून खुली व उदात्त अपेक्षा करीत असत.

त्यांच्याकडून आलेल्या सल्ल्याप्रमाणे –

1) भारताने खाजगी क्षेत्रांवरील बंधने काढून टाकावीत,
2) बाजारांतील सरकारची भूमिका कमी व्हावी,
3) व्यापारातील व्यापार्यांवरील बंधने हटवावीत.

जागतिक बँक आणि इंटर नैशनल फंड यांनी समोर ठेवलेल्या अटींना भारताने समती दिली व नवीन आर्थिक योजना जाहीर केली.

- **कर्जांचा मोठा दबाव:** सरकारचा खर्च हा उत्पन्नाच्या पेक्षा खूप अधिक होता. परिणामी , सरकारला बँकांकडून, सार्वजनिक आणि जागतिक वित्तीय संस्थांकडून पैसा कर्जरूपाने आणावा लागत होता.१९९१ मध्ये वसुलीची वित्तीय तुट देशाच्या एकूण अंतर्गत उत्पन्नाच्या ८.४ टक्के इतकी होती. इंटर नैशनल फंड या वित्तीय संस्थेने भारताला ७ बिलियन डोलारस् कर्ज देण्याचा निर्णय घेतला होता पण त्याचवेळी भारत सरकारला नवीन आर्थिक सुधारणा भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये आणण्यासाठी अतीव आग्रह केला होता, हट्ट केला होता.

- **गल्फचे संकट:** १९९०-९१ मधील इराक युद्धामुळे क्रूड तेलाच्या किमती खूप उंचावल्या.भारतला गल्फ देशांकडून बराच पैसा येत असे.युद्धाच्या स्थितीमुळे या अवस्थेला खूप गंभीर वळण मिळाले आणि गल्फच्या संकटामुळे द्देशाच्या एकूण देयतेतील तुट अधिकच वाढत गेली.

- **अकार्यक्षम व्यवस्थापन:** आर्थिक संकटाचे मूळ हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या अकार्यक्षम व्यवस्थापनातून उलगडले जाते.सरकार अंतर्गत साधनापासून जसे कर,सार्वजनिक क्षेत्रांतील संस्था इ. पुरेसे उत्पन्न कमविण्यात अकार्यक्षम ठरले आणि त्याचबरोबर सरकारी खर्च उत्पन्नाच्या पेक्षा अधिकतम संख्येने वाढला आणि एका ठिकाणी तो पेलण्यासाठी सरकार असमर्थ ठरले. वेळप्रसंगी परकीय चलन इतर देशांकडून कर्जाऊ आणले गेले आणि आंतर राष्ट्रीय वित्तीय संस्था दररोजच्या वापरातील गरजा भागविण्यासाठी खर्च करू लागल्या.

### ३. नवीन आर्थिक योजना – वैशिष्ठे

नवीन आर्थिक योजना १९९१ जुलै महिन्यामध्ये जाहीर केली गेली.त्यामध्ये विस्तृत प्रमाणात आर्थिक सुधारणांचा विचार केला गेला. या योजनेचे प्रमूख उद्दिष्ट हे भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये अधिकाधिक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे आणि उद्योगांच्या बाजारातील प्रवेशासाठी आणि वाढीसाठी येणारे अडथळे दूर करणे असा होता.

नवीन आर्थिक योजना जुलै १९९१ मध्ये जाहीर केली गेली. तिचे वर्गीकरण दोन प्रकारच्या घटकांमध्ये केले गेले. ते खालीलप्रमाणे आहेत :

1) **स्थिरीकरणाचे घटक** – हे कमी कालावधीचे घटक असून त्यांचे उद्दिष्ट –
   i. भारताच्या एकूण थकबाकीतील वित्तीय तुट पुरेसे परकीय चलन राखून सुधारणे.
   ii. वाढणाऱ्या किमतींवर नियंत्रण ठेवून महागाईवर योग्यप्रकारे नियंत्रण करणे.

2) **रचनात्मक सुधारणांचे घटक** – हे दुरगामी कालावधीचे घटक असून त्यांचे उद्दिष्ट –
   i. भारतीय अर्थव्यवस्थेची सक्षमता वाढविणे,
   ii. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध विभागांतील अडथळे दूर करून आंतर राष्ट्रीय स्पर्धात्मकता वाढविणे.
   iii. भारतीय उत्पादनांची आंतर राष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढविणे.

**नवीन आर्थिक योजनेची वैशिष्ठे**

सरकारने नवीन अर्थ योजनेतील वेगवेगळे बदल आणले ते खालील तीन मुद्द्यांमध्ये येतात :
1) उदात्तीकरण
2) खाजगीकरण
3) जागतिकीकरण

**४. उदात्तीकरण**

१९९१ च्या पूर्वी भारतामध्ये खूप सरकारी बंधने होती. ती कारखाने चालू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्या संबंधी ,आयात निर्यात व्यापारासंबंधी, परदेशी चलनामध्ये व्यवहार करण्यासंबंधी इ,अशी होती. जुलै १९९१ मध्ये आर्थिक सुधारणांची एक योजना जाहीर झाली तेव्हापासून भारतामध्ये उदात्तीकरण या प्रक्रियेला सुरुवात झाली. **उदात्तीकरण म्हणजे खाजगी क्षेत्रावरील सर्व बंधने काढून टाकणे**. दुसऱ्या शब्दांत हे असे दर्शविते की व्यापार आणि उद्योगाला आवश्यक नसणाऱ्या नियंत्रण कक्षेतून वा बंधनांतून मुक्त करणे म्हणजे उदात्तीकरण होय.

उदात्तीकरण यामध्ये दोन गोष्टी मोडतात त्या खालीलप्रमाणे आहेत :

१) खाजगी क्षेत्रासाठी बनविलेल्या नियमांना आणि अटींना शिथिल करणे,

२) जे अगोदर सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवलेले उद्योग आहेत, ते कार्यरत करून चालविण्याची परवानगी खाजगी क्षेत्रांना सुद्धा देणे इ.

उदात्तीकरणाचा वास्तविक हेतू हा देशांतील आर्थिक गुणवत्तेला पुरस्कृत करणे असा असून त्यासाठी खाजगी क्षेत्रांना आणि जागतिक कंपन्यांना गुंतवणूक आणि विस्तारासाठी प्रोत्साहन देणे असा होता.त्यातूनच, आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये नवीन स्पर्धा निर्माण करणे आणि कार्यकुशलतेची क्षमता वाढविण्यासाठी काही सुविधा पुरविणे असा होता. यांमुळे पुढे देशावरील कर्जाचा बोजा कमी होईल आणि आयातीच्या मार्गाचा उपयोग करून भांडवली वस्तू आणि यंत्रे प्रगतशील देशांकडून आणता येतील.

आर्थिक सुधारणा तत्वे जी सरकारने उदात्तीकरणाचा विचार करण्यासाठी घेतली त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होता:

1) औद्योगिक क्षेत्रांतील सुधारणा
2) आर्थिक क्षेत्रांतील सुधारणा
3) करांतील सुधारणा
4) परदेशी चलनांतील सुधारणा
5) व्यापार आणि गुंतवणूक योजनेतील सुधारणा इ.

### ४.१ औद्योगिक क्षेत्रांतील सुधारणा

औद्योगिक क्षेत्रांमध्ये आवश्यक सुधारणा आणण्यासाठी सरकारने नवीन औद्योगिक योजना २४ जुलै १९९१ मध्ये प्रस्तुत केली.या औद्योगिक सुधारणा योजनेच्या अंतर्गत खालील बाबींचा समावेश होता:

1) औद्योगिक कारखान्यांना परवाना ची गरज संपविली- नवीन योजनेने सर्व उद्योगांसाठी औद्योगिक कारखान्यांच्या परवान्याची गरज संपविली.यामध्ये छोट्या औद्योगिक कारखान्यांचा अपवाद होता जसे दारू,सिगारेट, घातक रसायने, बचावात्मक उपकरणे, औद्योगिक कारखान्यांतील स्फोटके इ. खालील कारणासाठी परवान्याची गरज नव्हती – अ) नवीन औद्योगिक संस्था उभारणीसाठी आ)अस्तित्वात असलेल्या औद्योगिक संस्थेचा विस्तार करण्यासाठी अगर विविध छोट्या संस्थांमध्ये विभागित करण्यासाठी इ. तरीही काही औद्योगिक संस्थाना त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि रणनीती चा विचार करण्यासाठी परवाना लागत होता.

2) सार्वजनिक क्षेत्रांची भूमिका कमी केली – एक महत्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे देशातील औद्योगिक कारखान्यांच्या प्रगतीतील सार्वजनिक क्षेत्रांची भूमिका खूप कमी केली. औद्योगिक कारखान्यांची संख्या जी सर्वतया सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवली होती ती १७ वरून ८ वरती घसरली.

3) छोट्या औद्योगिक कारखान्यांतील सुधारणा – छोट्या औद्योगिक कारखान्यांनी बनविलेल्या खूप वस्तू आता आरक्षित केल्या गेल्या. छोट्या औद्योगिक कारखान्यांच्या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीची मर्यादा पाच कोटींपर्यंत वाढविल्यामुळे हे संपादित करता आले. बाजारातील समाविशेताना बऱ्याच औद्योगिक कारखान्यांमध्ये किमती ठरविण्याची परवानगी देण्यात आली ज्या किमती अगोदर फक्त सरकारला ठरविण्याची मुभा होती.

4) मोनोपोलीज अन्ड रीस्ट्रीकटीव्ह ट्रेड प्रक्टिस कायदा – आधी उत्पादन क्षमता हि परवान्याशी जोडली गेली होती. उदात्तीकरण आणि विस्तारीकरणाच्या योजना आल्यापासून, मोठया कंपन्यांच्या गरजा, विस्तारासाठी प्राथमिक संमती घेण्यासाठी, नवीन संस्था प्रस्थापित करण्यासाठी, एकत्रीकरण करण्यासाठी, जोड उद्योग करण्यासाठी इ. दूर झाल्या. आता उत्पादक त्यांचा स्वतःचा व्यवसाय त्यांच्या स्वताःच्या इच्छेप्रमाणे बाजारी स्थितीवर अवलंबून राहून विस्तारीत करू शकत होते. २००२ मध्ये मोनोपोलीज अन्ड रीस्ट्रीकटीव्ह ट्रेड प्रक्टिस कायदा हास्पर्धा कायदा २००२ या नावाने बदलला गेला जो अधिक उदात्त पूर्ण व उदारमतवादी होता.

**४.२ आर्थिक क्षेत्रांतील सुधारणा**

आर्थिक क्षेत्रांमध्ये आर्थिक संस्था जसे व्यापारी बँका ,गुंतवणुकीच्या बँका, शेअर बाजारांतील घडामोडी आणि परदेशी चलन बाजार इ.यांचा समावेश आहे. भारतामध्ये आर्थिक क्षेत्र हे रीसर्व बँक ऑफ इंडिया कडून नियंत्रित केले जाते. आर.बी.आय. ची भूमिका हि नियंत्रक पासून आर्थिक क्षेत्रांतील सुलभ कार्यवाहीच्या चालकापर्यंत खाली आली आहे. उदा.१९९१ पर्यंत आर.बी.आय. बँकामधील कर्जावरील आणि ठेवींवरील व्याज दर ठरवीत असे. अशाप्रकारे, आर्थिक क्षेत्राला आर.बी.आय.चा सल्ला न घेता खूप बाबींवरील निर्णय घेण्याची परवानगी होती. सुधारणा योजनांमुळे खाजगी क्षेत्रांतील स्वदेशी आणि परदेशी सुद्धा बँकाच्या प्रस्थापनेसाठी चालना मिळाली. उदा. भारतीय बँका जसे आय.सी.आय.सी.आय.आणि परदेशी बँका जसे एच.एस.बी.सी. यांनी बाजारातील स्पर्धा वाढविली आणि त्यां कमी व्याज दरांमुळे आणि उत्तम सेवांमुळे ग्राहकांचा फायदा करून देऊ शकल्या.

बँकांमधील विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत वाढली. विदेशी गुंतवणूकदार संस्था जसे मर्चंट बँकरस्, म्युचुअल फंडस आणि पेन्शन फंडस यांना आता भारतीय आर्थिक बाजारामध्ये गुंतवणूक करण्यासाठी परवानगी दिली. जरी बँकांना भारतातून आणि परदेशांतून साधने निर्माण करण्यासाठी परवानगी दिली गेली तरीही काही अधिकार आर.बी.आय.ने राष्ट्रातील खातेधाराकांच्या सुरक्षित हितासाठी राखून ठेवले होते. काही अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर बँकांना आर.बी.आय. च्या संमती शिवाय नवीन शाखा प्रस्थापित करण्यासाठी स्वातंत्र्य दिले गेले. आता बँकांच्या सेवा देशाच्या प्रत्येक कोपऱ्यामध्ये उपलब्ध आहेत.

**४.३ करांतील सुधारणा**

करांतील सुधारणा म्हणजे सरकारच्या करप्रणालीतील सुधारणा आणि सार्वजनिक खर्चाच्या योजनेतील सुधारणा ज्याला एकत्रितपणे "वसुलीची योजना" असे म्हटले जाते.

करांचे दोन प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

i. **प्रत्यक्ष कर** – या करपद्धतीत करांचा बोजा हा सारख्याच व्यक्तीवरती लादला जातो. यांमध्ये व्यक्तीच्या उत्पन्नावरील कर आणि संस्थेच्या उद्योगातील झालेल्या फायद्यांवरील कर यांचा समावेश असतो. उदा. उत्पन्न कर (व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नावरील कर) कंपनीचा कर (कंपनीच्या झालेल्या फायद्यांवरील कर) इ. या करांचा बोजा दुसरीकडे परावर्तीत होऊ शकत नाही.

ii. **अप्रत्यक्ष कर -** या करपद्धतीत करांचा बोजा हा दोन वेगवेगळया व्यक्तीवरती लादला जातो. यामुळे व्यक्तीच्या उत्पन्नावर दररोजच्या वापरांतील वस्तूंवर होणाऱ्या खर्चामधून परिणाम होत असतो. सर्वसाधारणपणे हे अप्रत्यक्ष कर वस्तू आणि सेवा शुल्कांवर लादले जातात. उदा.विक्री कर,मूल्यवर्धित करप्रणाली कर,कस्टम ड्यूटी इ. या करांचा बोजा हा परावर्तीत करता येतो.

खाली दिल्याप्रमाणे महत्वाच्या कर सुधारणा केल्या गेल्या :

i. **कर कमी केले गेले** – १९९१ पासून उत्पन्न कर आणि कंपनी कर सतत कमी केले जात आहेत कारण करांचे अधिक दर असणे हे कर टाळण्याचे महत्वाचे कारण आहे. हे आता सर्वत्र संमत झाले आहे की उत्पन्न कराचे सर्वसामान्य दर हे बचतीला आणि ऐच्छिक प्रकटीकरणांतून उत्पन्न दर्शनीयतेला प्रोत्साहन देतात.

ii. **अप्रत्यक्ष करामधील सुधारणा** – अप्रत्यक्ष करामध्ये वैचारिक सुधारणा केली गेली ती वस्तूंचा आणि जीनसांचा एकत्रित राष्ट्रीय बाजार प्रस्थापित करून कार्यरत करण्यासाठी केली गेली. वस्तू आणि सेवांवरील कायद्याच्या सार्वभौम वापराची खात्री देण्यासाठी आपल्या देशातील सर्व राज्यांमध्ये प्रयत्न केले गेले अखेरीस, वस्तू आणि सेवांवरील कायद्याची अंमलबजावणी १ जुलै २०१७ रोजी झाली.

iii. **प्रक्रियेचे सुलभीकरण** – करदात्यांच्या अनुषंगाने सुकर पुर्ततेला प्रोत्साहित करण्यासाठी अनेक कार्यपद्धती या सुलभ केल्या गेल्या. १९९१ च्या आधी करदाते उत्पन्न कर अहवाल (विवरण) भरण्यासाठी नाखुश होते कारण त्यात खूप औपचारिकता होत्या आणि स्वतः व्यक्तीला स्वतःचे उत्पन्न कर विवरण तयार करून जमा करणे खूप अवघड होते.

### ४.४ परदेशी चलनातील सुधारणा

परदेशी चलन बाजारामध्ये महत्वाच्या सुधारणा केल्या गेल्या त्या खालीलप्रमाणे आहेत:

- **रुपयाचे अवमूल्यन**– रुपयाचे अवमूल्यन म्हणजे स्वदेशी चलनातील मुल्याची सरकारकडून विदेशी चलनाच्या तुलनेत केली गेलेली घसरण होय. थकबाकीच्या संकटावर मात करण्यासाठी विदेशी चलनाच्या समोर रुपयाची घसरण केली गेली. यांमुळे वाढत्या विदेशी चलनाच्या आवकेला चालना मिळाली. सरकारने रुपयाचे मूल्य त्याच्यावरील नियत्रण पासून स्वतंत्र ठेवण्यास परवानगी दिली. परिणामी, बाजार भावातील मागणी आणि पुरवठा भारतीय रुपयाच्या चलनाचे मूल्य विदेशी चलनाच्या प्रमाणात ठरविले.

### ५. व्यापार आणि गुंतवणूक योजनेतील सुधारणा

१९९१ पूर्वी स्वदेशी औद्योगिक कारखान्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी आयातीवर खूप निर्बंधने लादली गेली होती. तरीही या सुरक्षिततेच्या मुळे स्वदेशी उद्योग कारखान्याची क्षमता आणि स्पर्धात्मकता कमी झाली त्यामुळे आर्थिक वाढीची गती मंदावली. म्हणून व्यापार आणि गुंतवणुकीतील सुधारणा या उद्योग कारखान्यांच्या उत्पादनांतील जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी, भारतीय अर्थ व्यवस्थेमध्ये विदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान यांना प्रोत्साहन देण्यासाठी, स्वदेशी उद्योग कारखान्यांची सक्षमता वाढविण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाला स्वीकृती देण्यासाठी आणि विदेशी गुंतवणूक दारांना स्वातंत्र्य देऊन त्यांचा मोठा हिस्सा भारतीय इक्विटी मध्ये हस्तगत करण्यासाठी प्रामुख्याने करण्यात आल्या.

महत्वाच्या व्यापार आणि गुंतवणूक योजनेतील सुधारणा खालीलप्रमाणे आहेत:

- **आयात आणि निर्यातीवरील परीमाणांत्मक बंधने काढली गेली** – नवीन आर्थिक योजने प्रमाणे आयात आणि निर्यातीवरील परिमाणात्मक बंधने मोठया प्रमाणावर वगळण्यात आली. उदा.उत्पादन केलेल्या ग्राहक वस्तूंच्याअ आणि शेतकी उत्पादितांच्या आयातीवरील परीमाणांत्मक बंधने एप्रिल २००१ पासून पूर्णतया काढली गेली.

- **निर्यात शुल्क वगळले गेले-** आंतर राष्ट्रीय बाजारामध्ये भारतीय वस्तूंची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी निर्यात शुल्क वगळण्यात आले.
- **आयात शुल्क कमी केले**– स्वदेशी वस्तूंची स्थिती जागतिक बाजारांत उंचाविण्यासाठी आयात शुल्क घटविले गेले.स्वदेशी उद्योग कारखान्यांना सुरक्षितता देण्याची योजना आता काढली गेली.असलेल्या परिस्थितीत प्रभावीपणे आयातीच्या बदली कर्तव्यामध्ये निर्यात वाढविण्यावर भर दिला गेला.
- **आयातीसाठी परवाना पद्धती शिथिल केली गेली**– आयातीसाठी परवाना काढण्याची पद्धती काढून टाकली गेली, याला अपवादामध्ये घातक कर्तव्ये करणाऱ्या आणि वातावरणामध्ये संवेदनशील कर्तव्ये करणाऱ्या उद्योग कारखान्यांचा होता. यांमुळे प्रोत्साहित झालेले स्वदेशी उद्योग कारखाने यांना चांगल्या किमतीला कच्चा माल आयात करण्यासाठी उत्तेजन मिळाले की ज्यामुळे त्यांची सक्षमता वाढली ते अधिकाधि स्पर्धात्मक बनत गेले.

**सारांश**

१९९१ पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था विदेशी चलन आरक्षण घसरत जाण्याच्या संकटाला तोंड देत होती.यांमुळे आयात आणि निर्यातीतील पोकळी वाढली आणि महागाई सुद्धा वाढली.आर्थिक संकटामुळे,आंतर राष्ट्रीय संस्थांच्या दबावामुळे जसे आय.एम.एफ.आणि जागतिक बँक इ. १९९१ मध्ये आर्थिक योजना बदलण्याची गरज योजना कर्त्यांना वाटली. औद्योगिक क्षेत्रामध्ये आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये महत्वाच्या सुधारणा घडून आल्या. ती एक महत्वाची सुधारणा विदेशी चलनाच्या अवमुल्यनामध्ये आणि उदात्तीकरण यामध्येही अंतर्भूत होती. तीने वेगवेगळया प्रकारचे नवीन प्रगतीच्या मार्गांचे दरवाजे उघडले की जे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये एक बेंचमार्क म्हणून सिद्ध झाले.